दै. तरुण भारत १० ऑक्टोबर २००८

# कमला कॉलेजमध्ये पोस्टर प्रदर्शन

**▶कोल्हापूर / प्रतिनिधी**

कमला कॉलेजमध्ये लैंगिक छळ प्रतिबंधक समितीवच्यावतीने 'स्त्री समस्या व स्त्री कर्तुत्व' या विषयावर पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते.

यामध्ये स्त्री भ्रूण हत्या, हुंडाबळी, छेड-छाड, पुरूषी अत्याचार, बंधनातील स्त्री तसेच कर्तुत्ववान स्त्रिया, बंधनमुक्त स्त्री, स्त्री-स्वातंत्र्य, स्त्रियांची विविध क्षेत्रातील गगनभरारी, अशा विविध विषयांचा अंतर्भाव असणाऱ्या पोस्टर्सचे विद्यार्थिनींनी रेखाटले आहे. ५६ मुलींचा यामध्ये सहभाग आहे. या पोस्टर्समधून 'लेक वाचवा' हा संदेश देण्यात आला आहे.



**कमला कॉलेजमध्ये आयोजित पोस्टर प्रदर्शन पाहताना प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, प्रा. एम. ए. साळोखे, डॉ. तेजस्विनी मुडेकर, सोनल मोरे, आदी.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रदर्शनाचे संयोजन केले. समिती सदस्य प्रा. ए. एम. साळोखे, विद्यार्थिनी प्रतिनिधी सोनल मोरे, केतकी पाटील यांनी याकामी सहकार्य केले.